# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Property**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **11/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन मंगरूळपीर शहरांमध्ये पोलिसांची गस्त सुरू असताना तहसील कार्यालयासमोर बेवारस चांदीच्या दोन बांगड्या किंमत 22 हजार रू पोलिसांना मिळून आल्या. नमूद दागिने वरील ट्रेडमार्क वरून सराफाचा शोध घेऊन त्याचा मूळ मालक शोधून त्यांच्या ताब्यात दिल्या

लोकमत

## चांदीच्या बांगड्या पोलिसांनी केल्या परत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मंगरूळपीर:** हरविलेल्या चांदीच्या बांगड्या सापडल्या असता पोलिसांनी खात्री पटवून त्या बांगड्या संबंधित व्यक्तीस परत केल्या.

प्राप्त माहितीनुसार, गुरुवार, दि. १० फेब्रुवारी रोजी एएसआय हमराज डोंगरे, अमोल मुंदे, महम्मद परसुवाले, सचिन शिंदे हे पेट्रोलिंग करीत होते. यावेळी तहसील कार्यालयाच्या परिसरात त्यांना २२ हजार रुपये किमतीच्या दोन चांदीच्या बांगड्या दिसून आल्या. पोलिसांनी तहसील कार्यालय परिसरात ओळख पटवून त्या बांगड्या पोलीस ठाण्यातून घेऊन जाण्यासाठी सांगितले. हे कर्मचारी डीबी पथकाचे असल्याने त्यांनी बांगड्यावरील ट्रेडमार्कवरून सराफ व्यावसायिकांचा शोध घेऊन त्यांच्याकडून या बांगड्या कोणत्या ग्राहकाने घेतल्या होत्या, याची खात्री केली. तेव्हा या बांगड्या हेमंत राठोड (रा. निंबी) यांच्या असल्याचे निष्पन्न झाल्याने ठाणेदार सुनील हुड यांच्या हस्ते राठोड यांना देण्यात आल्या. पोलिसांच्या या कार्यासाठी एसडीपीओ यशवंत केडगे व ठाणेदार सुनील हुड यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

- तहसील कार्यालय परिसरात सापडलेल्या चांदीच्या बांगड्या चुकीने इतर कोणाच्या हाती पडू नये म्हणून पोलिसांनी आधी खरा मालक ओळखण्यासाठी बांगड्यांची काळजीपूर्वक तपासणी केली त्यावरील चिन्हाच्या आधारे सुवर्णाकाराकडे चौकशी करुन घेतली होती.

Hello Washim
Page No. 3 Feb 11, 2022
Powered by: erelego.com



बांगड्यांचे मालक हेमंत राठोड यांना बांगड्या परत करताना पोलिस.

## पेट्रोलिंगदरम्यान पोलिसांना सापडल्या चांदीच्या बांगड्या

### ओळख पटवून संबंधित व्यक्तीला केल्या परत

**प्रतिनिधी** | मंगरूळपीर

हरवलेल्या चांदीच्या बांगड्या पोलिसांनी सापडल्या असता खात्री पटवून सदर बांगड्या संबधित व्यक्तीस परत केल्या.

गुरुवारी एएसआय हमराज डोंगरे, पोहेकॉ अमोल मुंदे, पोकॉ महम्मद परसुवाले, सचिन शिंदे हे पेट्रोलिंग करत होते. यावेळी तहसील कार्यालयाच्या परिसरात त्यांना २२ हजार रुपये किमतीच्या दोन चांदीच्या बांगड्या दिसून आल्या. यावेळी पोलिसांनी तहसील कार्यालय परिसरात ओळख पटवून त्या बांगड्या पोलिस ठाण्यातून घेऊन जाण्याचे आवाहन केले.

सदर कर्मचारी डि. बी. पथकाचे असल्याने त्यांनी बांगड्या वरील ट्रेडमार्क वरून सराफा व्यावसायिकाचा शोध घेऊन त्यांच्याकडून त्या बांगड्या कोणी घेतल्या होत्या याची खात्री केली. निंबी येथील हेमंत राठोड यांच्या बांगड्या असल्याचे निष्पन्न झाल्याने ठाणेदार सुनील हुड यांच्या हस्ते राठोड यांना बांगड्या देण्यात आल्या. पोलिसांच्या या कामाचे एसडीपीओ यशवंत केडगे व ठाणेदार सुनील हुड यांनी कौतुक केले.